**ठळक बातम्या**

- राज्यात अकृषिक कर पूर्णपणे माफ /जैन, बारी, तेली, हिंदू-खाटीक, लोणारी, मच्छीमार या समाजांसाठी आर्थिक विकास महामंडळं स्थापन करण्याचा राज्य सरकारचा निर्णय

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर /वाशिममधून किसान सन्मान निधीचं वितरण, तर ठाण्यात ३२ हजार ८०० कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचा करणार प्रारंभ

- कोणत्याही परिस्थितीत रेल्वेचं खासगीकरण होणार नसल्याची रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची नाशिकमधे ग्वाही

- महिला टी-ट्वेंटी क्रिकेट विश्व चषक स्पर्धेत आज भारताचा पहिला सामना न्यूझीलंडबरोबर रंगणार

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ८०९ अंकांची घसरण

**<><><><><>**

अकृषिक कर पूर्णपणे माफ करायला राज्य सरकारनं आज मंजुरी दिली. गावठाणाबाहेरची घरं, शहरी भागातल्या बहुमजली इमारती, वाणिज्य आणि औद्योगिक वापराखालील जमिनींना आता हा कर द्यावा लागणार नाही. राज्यातल्या जैन, बारी, तेली, हिंदू-खाटीक, लोणारी, मच्छीमार या समाजांसाठी आर्थिक विकास महामंडळे

स्थापन करण्याचा निर्णय राज्य सरकारनं आज घेतला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत ३ ऑक्टोबर हा दिवसात मराठी अभिजात भाषा गौरव दिवस म्हणून साजरा करायचा निर्णयही सरकारनं घेतला.

ऑलिम्पिक, राष्ट्रकूल, आशियाई, युवा ऑलिम्पिक, पॅरालम्पिक यासारख्या स्पर्धेतल्या पदक विजेत्यांना आणि त्यांच्या प्रशिक्षकांना दिल्या जाणाऱ्या पुरस्काराच्या रकमेतही सरकारनं वाढ केली. या स्पर्धांमधल्या सुवर्ण पदक विजेत्यांना आता ५ कोटी रुपयांपर्यंतची रक्कम मिळेल.

रमाई आवास, शबरी आवास योजनेतल्या घरकुलांच्या अनुदानात वाढ होणार आहे. राज्यातले सर्व ऊसतोड, वाहतूक कामगार आणि मुकादमांना झोपडी तसंच बैल जोडी करिता विमा संरक्षण मिळेल. प्राचीन आणि ऐतिहासिक वास्तूंचे नुकसान करणाऱ्यांना आता २ वर्षांचा तुरुंगवास आणि १ लाख रुपयांपर्यंत दंड होईल.

राज्यातील लहान जलविद्युत प्रकल्प आणि त्याच्यासोबतचे सौर ऊर्जा प्रकल्प खाजगीकरणातून बांधा, वापरा व हस्तांतरण करा तत्वावर विकसित केले जाणार आहेत. कोकण आणि पुण्यासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद दलाची प्रत्येकी एक तुकडी स्थापन केली जाणार आहे. यासाठी ४२८ पदांची निर्मिती पोलीस महासंचालक करतील.

राज्यात आरोग्य क्षेत्रात उत्कृष्टता केंद्र स्थापन करायलाही मंत्रीमंडळानं आज मंजुरी दिली. तसंच पुण्यातला रिंगरोड, आणि १०४ ITI चे नामांतर, राज्यात हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्कला मंत्रीमंडळानं आज मंजुरी दिली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यादरम्यान उद्या सकाळी वाशिममध्ये सुमारे २३ हजार कोटी रुपयांच्या कृषी आणि पशुसंवर्धन क्षेत्राशी संबंधित विविध उपक्रमाचा प्रारंभ त्यांच्या हस्ते होणार

आहे. बंजारा वारसा संग्रहालयाचं उद्घाटनही ते करतील. प्रधानमंत्री किसान सन्मान निधीच्या १८ व्या, आणि प्रधानमंत्री नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेच्या ५ व्या हप्त्याचं वितरण प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे. कृषी पायाभूत सुविधा निधी अंतर्गत १ हजार ९२० कोटी रुपयांचे साडे सात हजाराहून अधिक प्रकल्प ते राष्ट्राला समर्पित करतील. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत राज्यात एकूण १९ मेगावॅट क्षमतेचे पाच सौर ऊर्जा पार्कचं प्रधानमंत्री उद्घाटन करणार आहेत. यावेळी प्रधानमंत्री मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या लाभार्थ्यांचाही सन्मान करतील.

त्यानंतर दुपारी ४ वाजता ठाण्यामध्ये ३२ हजार ८०० कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे. सुमारे १२ हजार २०० कोटी रुपयांच्या  ठाणे इंटिग्रल रिंग मेट्रो रेल्वे प्रकल्पाची आणि सुमारे ३ हजार ३१० कोटी रुपयांच्या छेडा नगर ते आनंद नगर या ईस्टर्न फ्रीवेच्या एलिव्हेटेड विस्ताराची पायाभरणीही ते करतील. तसंच सुमारे २ हजार ५५० कोटी रुपयांच्या नैना अर्थात नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्रातल्या विकासकामांच्या पहिल्या टप्प्याची पायाभरणी करतील. ठाणे महापालिकेच्या उच्चस्तरीय प्रशासकीय इमारतीची पायाभरणीही त्यांच्या हस्ते होणार आहे. ठाणे शहरात होणाऱ्या मुख्यमंत्री महिला सक्षमीकरण अभियान कार्यक्रमाला ते उपस्थित राहणार आहेत. प्रधानमंत्र्यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर ठाणे शहरात खारेगाव टोलनाका आणि कशेळी टोलनाका मार्गे ठाण्याकडे जाणाऱ्या सर्व मोठ्या मालवाहू वाहनांना आज रात्री १२ वाजल्यापासून ते उद्या रात्री १२ वाजेपर्यंत प्रवेशबंदी असेल.

उद्या संध्याकाळी ६ वाजता, बीकेसी ते आरे जेव्हीएलआरपर्यंत धावणाऱ्या मेट्रो ट्रेनला बीकेसी मेट्रो स्टेशनवरून प्रधानमंत्री हिरवा झेंडा दाखवतील. यावेळी बीकेसी आणि सांताक्रूझ स्थानकांदरम्यान ते मेट्रोनं प्रवास करणार आहेत.

**<><><><><>**

कोणत्याही परिस्थितीत रेल्वेचं खासगीकरण होणार नाही, अशी ग्वाही रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली आहे. ते आज नाशिकमध्ये रेल्वे सुरक्षा बलाच्या चाळिसाव्या स्थापना दिनाच्या कार्यक्रमात संचलनाचं निरीक्षण केल्यानंतर माध्यमांशी बोलत होते. रेल्वे सुरक्षा बलाच्या विभागीय प्रशिक्षण केंद्रांसाठी ३५ कोटी रुपयांचा निधी देण्याची घोषणाही वैष्णव यांनी केली. या केंद्रांमध्ये महिला कर्मचाऱ्यांसाठीच्या सोयीसुविधांवर विशेष भर देण्यात येणार आहे. याशिवाय रेल्वे सुरक्षा बलाच्या तमिळनाडू इथल्या श्वानपथक विभागीय प्रशिक्षण केंद्रासाठी साडेपाच कोटी रुपयांचा अतिरिक्त निधीही त्यांनी मंजूर केला. अश्विनी वैष्णव यांनी या कार्यक्रमात रेल्वे सुरक्षा बलाच्या ३३ कर्मचाऱ्यांना विशेष सेवा पदकं आणि जीवन रक्षा पदकंही प्रदान केली. रेल्वे सुरक्षा दलानं सुरक्षेच्या दृष्टीनं आधुनिक तंत्रज्ञानाशी चांगल्या प्रकारे जुळवून घेतल्याचं सांगून वैष्णव यांनी त्यांचं कौतुक केलं.

नाशिक-पुणे सेमी हायस्पीड रेलमार्गात नारायणपूर इथं २३ देशांनी उभारलेल्या दुर्बिण क्षेत्राचा अडथळा येत असून त्यासाठी पर्यायी मार्ग शोधण्याचं काम सुरू असल्याची ग्वाही वैष्णव यांनी दिली. नाशिक, लासलगाव आणि नांदगावसह १३२ रेल्वेस्थानकांचं पुनर्निर्माण होत असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

महिलांच्या टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारताचा पहिला सामना थोड्याच वेळात सुरू झाला असून. न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी कारायचा निर्णय घेतला आहे.

दरम्यान, आजच्या पहिल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं वेस्ट इंडीजवर १० गडी राखून दणदणीत विजय मिळवला. नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणासाठी उतरलेल्या दक्षिण आफ्रिकेनं वेस्ट इंडीजच्या संघाला निर्धारित २० षटकांमध्ये ६ गड्यांच्या मोबदल्यात ११८ धावांवर रोखलं. त्यानंतर ११९ धावांचं लक्ष्य एकही गडी न गमावता १३ चेंडू राखून सहज पूर्ण केलं.

**<><><><>**

गेल्या काही दिवसांपासून शेअर बाजारात सुरू असलेली घसरण आजही कायम राहिली. दिवसअखेर मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स ८०९ अंकांनी घसरुन ८१ हजार ६८८ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २३६ अंकांची घसरण नोंदवून २५ हजार  १५ अंकांवर बंद झाला.

**<><><><>**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय काल केंद्रीय मंत्रिमंडळानं घेतला. या निर्णयाचं महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात स्वागत होत आहे. राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांनी या निर्णयाचं स्वागत केलं आहे, तसंच राज्यातल्या जनतेच्या वतीने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मंत्रिमंडळाचे आभार मानले आहेत. गेल्या अनेक दशकांची महाराष्ट्राची ही मागणी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यामुळे पूर्ण झाली असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि अजित पवार यांनी दिली असून त्याबद्दल सर्व मराठी भाषाप्रेमींचं अभिनंदन केलं आहे. तसंच केंद्रसरकारचे आभार मानले आहेत.

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा बहाल झाल्यामुळे होणाऱ्या बदलांबाबत शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी सांगितलं.

**बाईट - दीपक केसरकर**

याखेरीज विविध राजकीय पक्ष, भाषाक्षेत्रात काम करणाऱ्या संघटना, संस्था आणि साहित्य वर्तुळातल्या अनेक मान्यवरांनी या निर्णयाबद्दल आनंद व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकण,राज्यातल्या चारही विभागांमधे तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**